निविदा फॉर्म किमंत रु.200/- ना परतावा


महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.
५३९, राजेंद्रनगर, कोल्हापूर-४१६ ००४.

दुरध्वनी क्र-०२३१-२६९६१०१/२/३ Website-www.sscboardkolhapur.in Email Id- divsec.kop@gmail.com


क्र.कोविमं/शाखा भांडार/2503 दिनांक:- 11 DEC 2023

**निविदा क्र. K-19/ भांडार/2024-2025/ सुमो, तवेरा, इंडिका इ. वाहने प्रासंगिक तत्वावर भाडयाने पुरविणे.**

**परिशिष्ट -अ**

विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर-416 004 यांचेकडून **सन 2024-2025** या वित्तिय वर्षात परिशिष्ट **अ** मध्ये दर्शविलेल्या अटी व शर्तीनुसार परिशिष्ट **ब** मधील सुमो,तवेरा,इंडिका इ. वाहने प्रासंगिक तत्वावर भाडयाने पुरविणेबाबत **दिनांक** 11/12/2023 **ते दिनांक** 20/12/2023 **या कालावधीत दरपत्रक मागविण्यात येत आहेत. दिनांक** 20/12/2023 **रोजी** दुपारी 4.00 **नंतर प्राप्त होणारी दरपत्रके कोणत्याही परिस्थितीत स्विकारली जाणार नाहीत.** या कामाचे अंदाजित निविदा मूल्य (Estimated Cost) रू. 2,00,000/- (रूपये दोन लाख फक्त) एवढे आहे.

निविदेसंबंधी अटी व शर्ती खालीलप्रमाणे :-

**निविदेसाठी अ लिफाफा [ आवश्यक कागदपत्रे] व ब लिफाफा (दरपत्रक) अशी पध्दत आहे.**

| | **अ- लिफाफ्यात सादर करावयाची कागदपत्रे** |
|---|---|
| 1. | बयाणा रक्कम रूपये 6,000/- (रूपये सहा हजार फक्त) डी.डी. द्वारे भरावयाची आहे. |
| 2. | मुंबई दुकाने व संस्था अधिनियम 1948 अन्वये व्यवसाय नोंदणी परवान्याची झेरॉक्स प्रत. |
| 3. | सन 2021-2022 व 2022-2023 चे भरणा केला असल्यास आयकर भरणा विवरण पत्र (Return / Acknowledgement) पॅन कार्ड व आधार कार्डची झेरॉक्स प्रत. |
| 4. | निविदासोबत वाहन पुरवठा क्षमता प्रमाणपत्र खालील नमुन्यात सादर करणे आवश्यक<br>**अ.क्र. \| वाहन प्रकार \| संख्या \| वाहन मॉडेल (पासून - पर्यंत) \| प्रवासी आसन क्षमता** |
| 5. | आर.टी.ओ. यांचे कडील वाहन पुरवठा करण्याबाबत महाराष्ट्र राज्य परवाना 2022-23 च्या नुतनीकरणासह सांक्षाकित प्रत जोडणे आवश्यक आहे |
| 6. | जीएसटी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक. ( लागू होत नसल्यास त्यानुसार हमीपत्र सादर करावे.) |
| 7. | निविदाधारकाने शासकीय अथवा निमशासकीय संस्थेमध्ये यापूर्वीच्या कामाच्या अनुभवाच्या प्रमाणपत्राची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे (कार्यादेश ग्राहय धरले जाणार नाही) |
| 8. | बँक पासबुक छायांकित प्रत. |

**ब - लिफाफ्यात सादर करावयाची कागदपत्रे**

उपरोक्त निविदेसाठी मंडळाचे अधिकृत दरपत्रक

उपरोक्त 01 ते 08 ची सर्व कागदपत्रे अ लिफाफा सोबत सादर करावयाची आहेत. कागदपत्रे अपूर्ण असल्यास अथवा त्यात त्रूटी असल्यास संबंधित निविदाधारकाचे दरपत्रक अपात्र करणे/अटी व शिथिल करणेचे अधिकार मंडळास राहतील. अपात्र ठरलेल्या निविदाधारकांच्या ब लिफाफ्याचा (दरपत्रक) विचार केला जाणार नाही.

## निविदा अटी व शर्ती

1 निविदेतील अटी व शर्तीप्रमाणे अ लिफाफा मधील माहिती आणि कागदपत्रे परिपूर्ण असल्याची खात्री करुन किंवा खरेदी समितीच्या निर्णयानुसार एखादी सूट देऊन लिफाफा ब (दरपत्रक) उघडला जाईल.

2 कमी रक्कमेची अथवा जादा रक्कमेची निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे हे अधिकार मंडळाच्या सक्षम समितीस राहतील. याबाबत कोणत्याही प्रकारची कारणे किंवा स्पष्टीकरण देण्यात येणार नाहीत.

3 अटी असलेल्या किंवा संदिग्ध निविदा (दरपत्रक) विचारात घेतल्या जाणार नाहीत. अमान्य निविदाधारकाची बयाणा रक्कम निविदासंबंधीची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर आपले मागणी पत्र सादर केल्यानंतर परत करण्यात येईल. निविदेच्या अटी शर्तीमध्ये बदल करणे, प्राप्त निविदापैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा हक्क मंडळाने राखून ठेवलेला आहे.

4 लघुउद्योजक व बेरोजगार म्हणून नोंदणी केलेल्या अथवा रजिस्टर्ड सोसायटी व सेवा सहकारी संस्था अशा निविदाकारांना बयाणा रक्कम/अनामत भरण्यापासून सूट मिळणार नाही.

5 दिलेले दर हे सर्व करांसहीत असणे आवश्यक आहे.

6 दरपत्रकामध्ये खाडाखोड दिसून आल्यास सदर दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.

7 मान्य निविदाधारकास पुरवठयाबाबत विहित नमुन्यात स्वखर्चाने रूपये 100/- रक्कमेच्या मुद्रांक पेपरवर करार करणे बंधनकारक राहील. करार करण्यास असमर्थता दर्शवल्यास बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

8 निविदेतील मान्य दर प्रथम आदेश दिल्यापासून उपरोक्त नमूद कालावधीसाठी अथवा पुढील वर्षासाठीची निविदा (दरपत्रक) प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत बंधनकारक राहतील त्यामध्ये कोणतीही वाढ दिली जाणार नाही. मक्तेदारांनी मान्य दरानेच वाहनांचा पुरवठा करावयाचा असून त्यामध्ये कोणत्याही प्रकारची भाववाढ दिली जाणार नाही.

9 सुमो, कुझर, इंडिका, तवेरा इ. वाहनांचा पुरवठा करीत असताना सदरची वाहने सुव्यवस्थित व चांगल्या स्थितीत असणे आवश्यक असून गाडीतील मीटर चालू स्थितीत असावा. मीटर बंद असलेली वाहने स्विकारली जाणार नाहीत.

10. वाहन चालकाजवळ गाडीबाबतची सर्व कागदपत्रे प्रवासाच्या वेळी असणे बंधनकारक आहे. वाहनचालक निर्व्यसनी असला पाहिजे. तसेच त्याची वर्तणूक अधिकारी व कर्मचारी यांच्याशी सौजन्यपूर्ण असली पाहिजे.

11. वाहनातून वहातूक करावयाच्या साहित्याबाबत विमा उतरविण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

12. वाहन कार्यालयात आल्यानंतर त्याची नोंद गेटवरील सुरक्षारक्षकाजवळील नोंदवहीमध्ये प्रथम करणे व परत आल्यानंतर झालेल्या किलोमीटरची नोंद करणे तसेच विहित नमुन्यामध्ये मंडळ प्रतिनिधीच्या स्वाक्षरीचा प्रवास अहवाल कार्यालयास देयकासोबत सादर करावा लागेल.

13. मंडळाने गाडी वापरासाठी निश्चित केलेल्या मार्गाच्या अंतरापेक्षा गाडीची धाव (रनिंग) जादा दर्शविल्याचे/ झालेचे निदर्शनास आल्यास, त्याबाबतचे अंतर कि.मी. व भाडेरक्कम देयकातून कपात करण्यात येईल. याबाबत मंडळाचा निर्णय अंतिम राहील.

14. प्रवासामध्ये वाहनात कांही तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास (पंक्चर/नादुरूस्त), त्यामुळे खोळंबा झालेस खोळंबा चार्ज दिला जाणार नाही. तथापि गाडी बंद पडल्यास पर्यायी व्यवस्था करण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

15. कार्यालयीन मालाचे वाहतुकी दरम्यान नुकसान झाल्यास मालाची नुकसान भरपाई देणे ठेकेदारावर बंधनकारक राहील.

16. मोटर वाहन नियमानुसार वाहनाचे आयुर्मान कमाल मर्यादेपेक्षा जास्त असू नये.

17. टोल नाक्याची रक्कम मंडळामार्फत देण्यात येईल. मात्र मूळ पावत्या मंडळ प्रतिनिधीकडून प्रमाणित करून देयकासोबत मंडळाकडे सादर करणे बंधनकारक राहील. तसेच देयक दोन प्रतीत सादर करावे.

18. मान्य निविदाधारकास रू. 10,000/- (रूपये दहा हजार फक्त) इतकी रक्कम सुरक्षा ठेव (सिक्युरिटी डिपॉझिट) स्वरूपात मंडळाकडे धनाकर्षाद्वारे (DD) करार कालावधीकरीता जमा करावी लागेल. मान्य ठेकेदाराची सुरक्षा ठेव काम समाधानकारक पूर्ण झाले असल्यास करार मुदत संपल्यानंतर 3 महिन्यांनी लेखी मागणीने परत करण्यात येईल. सदर रक्कमेवर कोणतेही व्याज वा लाभांश मंडळाकडून देय असणार नाही.

19. मान्य निविदाकाराने सुरक्षा ठेव जमा केल्यानंतर व करारनामा स्वाक्षरीनंतर पुरवठा आदेश/ कार्यादेश देण्यात येईल.

20. मंडळाचे कामकाज हे महत्त्वाचे, कालमर्यादित व तातडीचे असल्याने ते वेळेत पूर्ण करणे आवश्यक ठरत असलेने मागणीप्रमाणे वाहनांचा त्वरीत पुरवठा या तत्वानुसार सेवा देणे ठेकेदारावर बंधनकारक राहील. असे न केल्यास देयक / बयाणा / सुरक्षा ठेवमधून प्रत्येक तासास रु. 100/- या प्रमाणे दंडाची आकारणी करण्यात येईल.

21. या कार्यालयाची सर्व महत्वाची तातडीची कामे विचारात घेता ठेकेदाराने सेवा तातडीने व समाधानकारक देणे आवश्यक राहील. गोपनीय साहित्य ठरवून दिलेल्या ठिकाणी वेळेत व सुरक्षित पोहचविणे ठेकेदारावर बंधनकारक राहील. याबाबत मंडळ कर्मचारी व मंडळाची मालमत्ता यांचे आर्थिक नुकसान झाल्यास त्याची भरपाई ठेकेदाराने देणे बंधनकारक राहील. तसेच ठेकेदारांचे काम समाधानकारक आढळले नाही तर देण्यात आलेले काम कोणत्याही क्षणी काढून घेण्याचा अधिकार मंडळास राहील.

22. कार्यालयाने विहित केलेल्या नमुना दरपत्रकातील दरच प्राप्त निविदासाठी ग्राहय धरण्यात येतील. नमुन्यात नसलेल्या दराचा विचार केला जाणार नाही.

23. आवश्यकतेनुसार कराराची मुदत वाढविण्याचे अथवा कमी करण्याचे अधिकार विभागीय मंडळास राहतील. जर करारास मुदतवाढ दिली तर वाढीव कालावधीचा करारनामा करुन पूर्वीच्याच दराने काम करून द्यावे लागेल.

24. निविदा उघडल्यानंतर न्यूनतम दराच्या (L1) निविदाधारकाने निविदा प्रक्रियेतून माघार घेतल्यास सदर निविदाधारकाची बयाणा रक्कम जप्त करणे / दंड वसूल करणे / काळया यादीमध्ये समाविष्ट करणे याबाबतचे अधिकार विभागीय मंडळास राहतील.

25. निविदा पूर्णत: अगर अंशत: स्विकारणे अगर नाकारणे याचा अधिकार मंडळाने राखून ठेवलेला आहे. याबाबत कोणत्याही न्यायालयात जाण्याचा हक्क ठेकेदारास असणार नाही.

26. निविदा प्रक्रिया कोणत्याही टप्यावर रद्द करण्याचा अधिकार विभागीय मंडळाने राखून ठेवलेला आहे.

27. करारातील शर्तीनुसार ठेकेदार जर नुकसान भरपाईस जबाबदार असेल तर खालीलपैकी कोणतेही एक अगर सर्व मार्ग स्विकारणेचा अधिकार माध्य. व उच्च माध्य. शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर यांना राहील.

    अ) कंत्राट रद्द करणे यामध्ये ठेकेदाराची सर्व रक्कम जप्त करणे.

    ब) मंडळाकडून सोपवण्यात आलेले काम अन्य ठेकेदाराकडून करवून घेतलेस होणाऱ्या नुकसानीस ठेकेदार जबाबदार राहील. त्यांचेकडून ती रक्कम वसूल करणेत येईल.

    क) मंडळाच्या सूचनेनुसार करारानुसार काम करणेस नाकारलेस ठेकेदाराचे नाव काळया यादीमध्ये घालणेचा संपूर्ण अधिकार विभागीय मंडळास राहील.

28. कराराच्या कालावधी दरम्यान उपरोक्त संदर्भात जर काही वाद/तंटा उद्‌भवल्यास तो फक्त कोल्हापूर येथील न्यायालयाच्या (कोर्टाच्या) कार्यकक्षेतच चालेल. त्याचा सर्व खर्च ठेकेदारास द्यावा लागेल.

29. सदरची निविदा वार्षिक असलेने करार कालावधीपासून पुढील एक वर्षासाठी मंडळ गरजेनुरुप वेळोवेळी आदेश देवून सुमो / इंडिका / तवेरा इ. वाहनाची मागणी करेल.

30. ठेकेदाराने सादर केलेली निविदा व निविदेतील दर लिफाफा **ब** उघडलेनंतर 120 दिवसांपर्यंत वैध राहील.

31. देयकातून आयकर विभागाच्या 194 सी कलमानुसार 2 % आयकर (TDS) व GST TDS कपात करण्यात येईल.

स्थळ :-कोल्हापूर
दिनांक:-11/12/2023

(डी.एस.पोवार)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.
५३९, राजेंद्रनगर, कोल्हापूर-४१६ ००४.
दुरध्वनी क्र-०२३१-२६९६१०१/२/३ Website-www.sscboardkolhapur.in Email Id- divsec.kop@gmail.com

**निविदा क्र. K-19/ भांडार / सुमो,तवेरा, इंडिका इ. वाहने प्रासंगिक तत्वावर भाडयाने पुरविणे / 2024-2025 चे अधिकृत दरपत्रक ब**

निविदाधारकाचे नांव : ----------------------------------------------------------------------------------------

पत्ता : ----------------------------------------------------------------------------------------

दूरध्वनी / मोबाईल क्रमांक : ------------------------------------------

| अ.क्र. | | वाहन प्रकार व वाहनाची आसनक्षमता | प्रति किमी. दर | | मुक्काम दर प्रति दिनी | | 8 तास / 100 किमी स्थानिक दर (फक्त लोकल) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | 2 | 3 | | 4 | | 5 | |
| | | | नॉन ए.सी. रुपये | ए.सी रुपये | नॉन ए.सी. रुपये | ए.सी रुपये | नॉन ए.सी. रुपये | ए.सी रुपये |
| 1 | अ | टाटा सुमो 9 सीटर | | | | | | |
| 2 | | फोर्स क्रुझर 12 सीटर | | | | | | |
| 3 | | शेवरोले तवेरा 9 सीटर | | | | | | |
| 4 | | टोयाटो इनोव्हा/ईर्तिगा 7 सीटर | | | | | | |
| 5 | | टाटा इंडिका व्हीस्टा 4 सीटर | | | | | | |
| 6 | ब | फोर्स ट्रॅव्हलर 14 सीटर | | | | | | |
| 7 | | फोर्स ट्रॅव्हलर 17 सीटर | | | | | | |
| 8 | | लक्झरी बस 35 सीटर | | | | | | |

1. अ प्रकाराकरिता वाहनांकरिता कमीत कमी प्रतिदिन 300 किमीचे भाडे लागू असेल. तसेच वाहनांना लागणा-या राज्य परिवहन कार्यालयाकडील टेम्पररी परमिटचे पैसे वाहनाच्या भाडेबिलामध्ये वेगळे आकारणेत येतील.
2. सर्व वाहनांकरिता लागणारे टोल भाडेबिलामध्ये वेगळे आकारणेत येतील. (टोल पावती सादर करणे बंधनकारक आहे.)

निविदा क्र. K-19/भांडार/2024-2025 मधील सर्व अटी व शर्ती मी वाचल्या असून त्या माझेवर बंधनकारक राहतील.

स्थळ :

निविदाधारकाचे नाव व स्वाक्षरी

दिनांक :

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.
५३९, राजेंद्रनगर, कोल्हापूर-४१६ ००४.
दुरध्वनी क्र-०२३१-२६९६१०१/२/३ Website-www.sscboardkolhapur.in Email Id- divsec.kop@gmail.com

दरपत्रक सूचना क्र.कोविमं/भांडार/2503 दिनांक:- 11 DEC 2023

** दरपत्रक सूचना **

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर 416 004. वित्तीय वर्ष सन 2024-2025 साठी खालील बाबीसाठी दरपत्रक मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | दरपत्रक क्रमांक | दरपत्रकाचा तपशील | दरपत्रकाचे मूल्य (अंदाजित) | बयाणा रक्कम | दरपत्रक संचाची किंमत |
|---|---|---|---|---|---|
| 1 | K - 19 | कार्यालयासाठी सुमो,तवेरा, इंडिका इ. वाहने प्रासंगिक तत्वावर भाडयाने पुरवठा करणे | 2,00,000/- | 6,000/- | 200/- |

**उपरोक्त दरपत्रक अर्जांची विक्री व अर्ज भरुन जमा करण्याचा दिनांक** 11/12/2023 **सकाळी** 11.00 **वाजल्यापासून दिनांक** 20/12/2023 **दुपारी** 4.00 **वाजेपर्यंत राहील. कागदपत्रांचा अ लिफाफा कार्यालयाच्या सोईने उघडण्यात येईल.**

**सही /-**
**(डी.एस. पोवार)**
**विभागीय सचिव,**
महाराष्ट्र राज्य माध्य. व उच्च माध्य. शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.